# मुंबई विद्यापीठ

क.का.प्रा.वि./आयसीडी/२०२३-२४/८९
व्यवस्थापन परिषद

**मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२३-२४ मधील**
**७ जून, २०२३ च्या बैठकीचे इतिवृत्त.**

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा बुधवार **दिनांक ७ जून, २०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता** सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, मुंबई -४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली होती.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु.क्र. | माननीय सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती / अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १. | प्रा. दिगंबर शिर्के (प्रभारी कुलगुरू) | अध्यक्ष | उपस्थित |
| २. | प्रा. अजय भामरे (प्रभारी प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३. | डॉ. शेषाद्री चारी | सदस्य | उपस्थित |
| ४. | डॉ. अनिल कुमार सिंग (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | अनुपस्थित |
| ५. | डॉ. कविता लघाटे (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ६. | प्रा. शिवराम एस. गर्जे | सदस्य | अनुपस्थित |
| ७. | डॉ. संदीप सिंग | सदस्य | उपस्थित |
| ८. | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १०. | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ११. | प्रा. सुनिल भिरूड (प्रभारी कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| १२. | प्रा. (सीए) प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी. | सदस्य | उपस्थित |
| १३. | डॉ. प्रसाद कारंडे (प्रभारी संचालक, प.व मु मं) | निमंत्रित | उपस्थित |

1

**स्वागत** :-सदस्य सचिवांनी मा.अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करुन सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

**श्रध्दांजली**

**डॉ. किशोर सानप**

ख्यातनाम समीक्षक व संत साहित्याचे अभ्यासक डॉ. किशोर सानप यांचे अल्पशा आजाराने दिनांक २७ मे, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६७ वर्षांचे होते.

**रवींद्र वैद्य**

जेष्ठ समाजवादी नेते, पत्रकार रवींद्र वैद्य रवींद्र यांचे वृध्दापकाळाने दिनांक २६ मे, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षांचे होते.

**जयंत सहस्त्रबुध्दे**

विज्ञान भारतचे राष्ट्रीय संघटन सचिव आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक जयंत सहस्त्रबुध्दे यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०२जून, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५७ वर्षांचे होते.

**सुलोचना लाटकर**

जेष्ठ अभिनेत्री, पद्मश्री व महाराष्ट्र भूषण सुलोचना लाटकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०४ जून, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९४ वर्षांचे होत्या.

**अशोक खराडे**

महाराष्ट्र शासन पुराभिलेख विभागाचे माजी संचालक अशोक खराडे यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०४ जून, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७५ वर्षांचे होते.

**गुफी पेंटल**

जेष्ठ अभिनेते गुफी पेंटल यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०५ जून, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७९ वर्षांचे होते.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र. १ | दिनांक १७ मे, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, दिनांक १७ मे, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्तास खालील सुचनेसह मान्यता देण्यात आली.<br>बाब क्र. १२ मध्ये मा. कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव आणि वित्त व लेखा अधिकारी यांची नावे न लिहिता पदनाम लिहण्यात यावे. | |
| बाब क्र. २ | Establishment of Research and Development Cell in the University and Affiliated Colleges. | शैक्षणिक नेमणूक आणि गुणवत्ता हमी विभाग |
| ठराव | It is resolve that the Establishment of Research and Development Cell in the University and Affiliated Colleges be accepted | |
| बाब क्र. ३ | विद्यापीठाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ३७ (झ) अन्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ते२०२८-२९ करिता पंचवार्षिक बृहत आराखडा शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्याबाबत. | महाविद्यालय संलग्नता आणि मान्यता विभाग |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, दिनांक ५ जून, २०२३ रोजीच्या बाब क्र. २.१ नुसार अधिष्ठता मंडळाने तयार करून मंजूर केलेला शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ करिता पंचवार्षिक बृहत आराखडा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ३७ (झ) अन्वये व्यवस्थापन परिषदेने सुचवलेल्या दुरूस्तीसह सोबत जोडलेल्या "परिशिष्ट-०१" प्रमाणे विद्या परिषदेस शिफारस करण्यात आली.(प्रत संलग्न) | |
| बाब क्र. ४ | सोबत सेक्रेटरी, साकेत ज्ञानपीठ कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड कॉमर्स, साकेत विद्यानगरी मार्ग, चिंचपाडा, कल्याण (प), ठाणे - ४२१ ३०६ या महाविद्यालयाचे पत्र क्र. SGP/2022-23 दिनांक २६ एप्रिल, २०२३ अन्वये "साकेत ज्ञानपीठ कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड कॉमर्स **च्या ऐवजी** साकेत ज्ञानपीठ साकेत कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय" असा महाविद्यालययाच्या नावात बदल करण्याबाबतचा प्रस्ताव. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |

3

| | | |
|---|---|---|
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, साकेत ज्ञानपीठ कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड कॉमर्स, साकेत विद्यानगरी मार्ग, चिंचपाडा, कल्याण (प), ठाणे – ४२१ ३०६ या महाविद्यालयाचे पत्र क्र. SGP/2022-23 दिनांक २६ एप्रिल, २०२३ अन्वये ''साकेत ज्ञानपीठ कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड कॉमर्स च्या ऐवजी साकेत ज्ञानपीठ साकेत कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय'' असा महाविद्यालययाच्या नावात बदल करण्याबाबतच्या प्रस्तावास २५,००० रूपये शुल्क घेवून मान्यता देण्यात आली.<br>पुढे असाही ठराव करण्यात आला की, संलग्नता व मान्यता विभाग यांच्याकडून "नो डयुज सर्टिफिकेट"घेण्यात यावे. | |
| बाब क्र. ५ | मे.चिंतामणी बेरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांच्यामार्फत स्वच्छतेचे काम करून घेण्यात मुदतवाढ देण्याबाबत. | फोर्ट प्रशासकिय विभाग |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, मे.चिंतामणी बेरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांच्यामार्फत स्वच्छतेचे काम करण्यासाठी ३ महिने मुदतवाढ देण्यात आली. तसेच विहित कालावधीत टेंडरची प्रक्रिया देखिल राबवण्यात यावी. | |
| बाब क्र. ६ | As per the UGC-DEB ODL regulations 2020, the total posts required for the programmers offered are 43, Within which 5 posts are already filled on permanent basis, The approval is need for 38 and advertisement will be for 39 posts as one permanent faculty is on lien.<br>Considering the urgency and the fact urgently approve the 38 posts and advertise 39 posts as mentioned.<br>Submitted for your kind approval. | Institute of Distance and Open Learning |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, दूर व मुक्त अध्ययन संस्था येथे कायमस्वरूपी पदे न देता संबधित विभागाने ११ महिन्यांसाठी जाहिरात देण्यात यावी. ११ महिन्याच्या पत्रामध्ये सेवासमाप्तीच्या कालवधीची स्पष्टपणे नोंद करण्यात यावी. | |
| बाब क्र. ७ | मिलेट्रीच्या सैनिक भरती करिता विद्यानगरी परिसरातील क्रिकेटचे ग्रांउड, बास्केट बॉल कोर्ट, उत्तर द्वार लगतची मोकळी जागा तसेच शारिरिक शिक्षण इमारतीतील बहुउद्देशीय सभागृह आरक्षित करणेबाबत. | सामान्य प्रशासन विभाग, कलिना. |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, मिलेट्रीच्या सैनिक भरती करिता विद्यानगरी परिसरातील क्रिकेटचे ग्रांउड, बास्केट बॉल कोर्ट, उत्तर द्वार लगतची मोकळी जागा तसेच शारिरिक शिक्षण इमारतीतील बहुउद्देशीय सभागृह आरक्षित करण्याकरिता नियमाप्रमाणे भाडे आकारण्यात यावे. तसेच आवश्यक डागडूजी व इतर सुविधा संबधित कार्यालयाने करावी. | |

4

कुलसचिवांनी उपस्थितांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

कुलसचिव (प्र.)

प्र—कुलगुरू

कुलगुरू (प्रभारी)

5